आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र – दुपारी ३.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

राज्यसभेत आज ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ या  विधेयकावर चर्चा सुरू आहे. महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतीयांश आरक्षण देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज याबाबतचं  घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडलं. लोकसभेत काल हे विधेयक मंजूर झालं होतं. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या महिलांसाठीचं ३३ टक्के आरक्षण देखील सध्याच्या कोट्या अंतर्गत दिलं जाणार असून,  त्यासाठी जनगणना आणि सीमांकन आवश्यक असल्याचं मेघवाल यांनी सांगितलं.

काँग्रेसनं या विधेयकाला पाठिंबा दिला आहे मात्र विधेयक सादर करण्यात झालेल्या विलंबाबद्दल काँग्रेस खासदार रंजित रंजन यांनी नाराजी व्यक्त केली. तृणमूल काँग्रेसच्या डोला सेन, द्रमुकच्या डॉ कनिमोळी सोमू आणि आप पक्षाचे सदीप कुमार पाठक यांनीही चर्चेत भाग घेतला.

या चर्चेसाठी राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी केवळ महिलांची तालिका उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे.  यात पी.टी.उषा, जया बच्चन, फौजिया खान, सरोज पांडे, डोला सेन या सदस्यांचा समावेश आहे.

<><><><><><>

लोकसभेत महिला आरक्षणाबाबतचं ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ विधेयक मंजूर झाल्यामुळे महिला वर्गात नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असं प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेच्या सकाळच्या सत्रात बोलत होते. हे विधेयक मंजूर करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले. लोकसभेत काल मतविभागणीनंतर

हे विधेयक मंजूर झालं. यामध्ये 454 खासदारांनी विधेयकाच्या बाजूनं, तर दोन खासदारांनी विरोधात मतदान केलं होतं.

<><><><><>

सामान्य कुटुंबांकडून बचतीत झालेली घट आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या विपरीत परिणामांचं वृत्त अर्थ मंत्रालयानं फेटाळलं आहे. विविध वित्तीय उत्पादनांच्या बाबतीत ग्राहकांच्या बदललेल्या प्राधान्यक्रमामुळं हे बदल झाल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. जून २०२० ते मार्च २०२३ या कालावधीत कुटुंबांची एकूण मालमत्ता ३७ टक्क्यांहून अधिक वधारली तर कर्जाचं प्रमाण ४२ टक्क्यांहून अधिक वधारलं. यात फारसा फरक नसल्याचं मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><><>

कांदा लिलावावर बहिष्कार टाकणाऱ्या नाशिक जिल्ह्यातल्या कांदा व्यापाऱ्यांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधकांनी बाजार समित्यांच्या सभापती आणि सचिवांना दिले आहेत. जिल्ह्यातल्या १७ जिल्ह्यातल्या बाजार समित्यांमधले कांदा लिलाव व्यापाऱ्यांनी काल पासून बंद केले आहेत. त्यानंतर काल रात्री हे आदेश देण्यात आले.

<><><><><>

अहमदनगर जिल्ह्यात टंचाईग्रस्त भागात पिण्याचे पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनानं युद्धपातळीवर काम करावं. अशा सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या आहेत. संगमनेर तालुक्यातल्या टंचाईचा आढावा काल विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र – दुपारी ३.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

राज्यात दुष्काळाच्या झळा किती तीव्र आहेत याची जाणीव सरकारला नाही, फक्त आश्वासन देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून मोकळं व्हायचं हीच महायुती सरकारची कार्यपद्धती असल्याची टीका विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. राज्यात गेल्या अडीच महिन्यांमध्ये अत्यंत कमी पाऊस पडला आहे. हीच परिस्थिती राहिली तर आगामी काळात दुष्काळाचं मोठं संकट महाराष्ट्रावर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.  राज्यात १ जानेवारी ते ३१ जुलैपर्यंत तब्बल १ हजार ५५५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, असं वडेट्टीवार यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वात आज घरोघरी महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचं आगमन होणार आहे. गौरींच्या स्वागतासाठी गृहलक्ष्मींची लगबग सुरू आहे. गौरींच्या स्थापनेसाठी आवश्यक पूजा साहित्य, मखर, कपडे, अलंकार तसंच अन्य खरेदीसाठी गेल्या दोन दिवसांपासून बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे. गौरी पूजनासाठी निरनिराळी फळं, भाज्या, तसंच फुलांच्या बाजारपेठाही सजल्या आहेत.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यात मोरा गावा जवळच्या समुद्रात काल मासेमारीसाठी गेलेल्या तीन व्यक्ती होडी उलटल्यामुळे पाण्यात पडले. त्यापैकी एक जण मृत्युमुखी पडला, तर इतर दोन जण पोहत किनाऱ्यावर पोहोचले.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ – गुरुवार

पनवेल महापालिकेनं आज कामोठ्यात “मेरी माटी मेरा देश” अंतर्गत अमृत कलश यात्रेचं आयोजन केलं होतं. नवीन पनवेल आणि कळंबोलीमध्ये काल ही यात्रा झाली.

<><><><><><>

अहमदनगर जिल्ह्यात देवळाली प्रवरा नगर परिषदेनं ‘मेरी माटी मेरा देश’ अभियाना अंतर्गत काल अमृत कुंभ कलश यात्रा आयोजित केली होती. देवळाली प्रवरानगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि छत्रपती माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते.

//<><><><><><>//